# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 137/2022 दिनांक : 05.04.2022

## 1)दरोडा :—

**भोकर :—**दिनांक 03.04.2022 रोजी सकाळी 10.30 वा. चे सुमारास, **फिर्यादी बाईचे शेतात ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस धमकावून तीला शिवीगाळ करुन,मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देवून तिच्या गळयातील सोन्याचे दागीने किंमती 1,50,000/— रुपयाचे बळ जबरीने काढुन घेवून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी रुक्मीनी शंकर भुसेवाड, वय 23 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. नांदा म्है.प. ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 120/2022 कलम 395,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री दिगांबर पाटील, मो. नं. 9850550670** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**अर्धापुर :—**दिनांक 04.04.2022 रोजी चे 11.50 वा. चे सुमारास, **शाहुजी दत्तराम टेकाळे यांचे शेतात कॅनल जवळ दाभड शिवारात रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी हा नॉबफिन्स कंपनीचे कर्जवसुली करुन हिरो होंडा कंपनीचे मोटर सायकल क्रं. एम.एच./26—बीएम—9389 वर बसून खातेदारांकडून वसूल केलेली रक्कम 1,74,800/— रुपयासह नमुद ठिकाणावरुन जात असताना रोडवर अनोळखी तिघेजन तोंडाला पांढऱ्या दस्त्या बांधलेले त्यापैकी दोन सरदारची पगडी बांधलेले व एक पगडी नसलेला रोडवर फिर्यादीचे मोटार सायकलला आडवा आला व मोटार सायकल आडवी पाडून तीघांनी फिर्यादीस रोडच्या बाजुला टिन प्त्राचे शेडकडे घेवून जावून धक्काबुक्की करुन परत मोटार सायकल जवळ येवून मोटार सायकलला अडकवलेली पैशाची बॅग घेवून आरोपी मोटार सायकलवर बसून पळुन जात असताना फिर्यादीने त्यांचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपीतांनी फोटो खिच्या क्या म्हणुन फिर्यादीस खंजरचा धाक दाखवुन फिर्यादीचा रिअलमी कंपनीचा 5000/— रुपयाचा मोबाईल व नगदी असा एकुण 1,79,800/— रुपयाचा ऐवज जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शंकर लक्ष्मण चिमटे, वय 25 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. बोरगाव पो. आडगाव ता. लोहा जि. नांदेड ह. मु. श्रीहरी यांचे वाडयात नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 88/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री आगलावे**, **मो.क्रं. 9767777884** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 16.03.2022 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **नागसेननगर,नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी फिर्यादी घरी नसतांना त्याचे गैरहजरीत दिवसा घराचे कडी कोंडा कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन सोन्या चांदीचे दागीने व नगदी असा एकुण किंमती 4,80,000/—रुपयाचा ऐवज चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी संगिता विश्वनाथ सोनकांबळे, वय 46 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. नागसेननगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 122/2022 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री देवकत्ते**, **मो.क्रं. 8975761232** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :—

**इस्लापुर :—**दिनांक 01.04.2022 रोजी चे 12.00 ते दिनांक 02.04.2022 चे 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरुन इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपणीची मो.सा. क्रं. एमएच—26/एपी—6173 किंमती 25,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बालाजी किसनराव मोरे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 35/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री तोंडेवाड, मो.क्र. 8080308059** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 04.04.2022 रोजी चे रात्री 12.30 वा. चे सुमारास, **यशोधरा बौध्द विहारसमोर सार्वजनिक रोडवर जयभिमनगर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन दारुचे नशेत फिर्यादीचे मित्राचे डोक्यात बियरची बॉटल मारुन दुखापत केल्याने फिर्यादी हा आरोपीतांना जाब विचारण्यास गेला असता आरोपीतांनी फिर्यादीचे डोक्यात छोटया तलवारीने उलटया बाजुने मारुन डोके फोडुन गंभीर दुखापत केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कुणाल दिगांबर सावंत, वय 28 वर्षे, व्यवसाय चालक रा. जयभिमनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 121/2022 कलम 326,324,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री गायकवाड, मो. नं. 9370933727** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**1)मुक्रमाबाद :–** सन 2010 ते आज पावेतो, **फिर्यादीचे राहते घरी मौजे रावणकोळा ह.मु. माहेरी दापका गुंडोपंत ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करुन तु पांढऱ्या पायाची आहेस तू आम्हाला गिळतेस असे म्हणुन तुझ्या माहेरहुन गुत्तेदारीसाठी दहा लाख रुपये घेवुन ये म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 37 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 86/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/श्री 1677 शेख ताहेर**, **मो.क्रं. 8421437070** हे करीत आहेत.

**2)हदगाव :–** दिनांक 08.08.2016 ते दिनांक 28.03.2022 रोजीचे दरम्यान, **मौजे ल्हयारी ता. हदगाव जि. नांदेड ह. मु. तुळजाभवानी नगर तरोडा बु. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन तुझ्या माहेरहुन दहा लाख रुपये व दागीने घेवुन ये म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 30 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 113/2022 कलम 498(अ),341,323,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गायकवाड**, **मो.क्रं. 7758864052** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** डिसेंबर 2020 ते दिनांक 01.01.2022 पर्यंत, **औरदशाहाजी ता. निलंगा फिर्यादीचे राहते घरी जि. लातुर येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तुझ्या माहेरहुन बुलेटचे शोरुम टाकण्यासाठी पन्नास लाख रुपये घेवुन ये म्हणुन उपाशी पोटी ठेवून तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 26 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 90/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1691 कदम**, **मो.क्रं. 9623658510** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**मुदखेड :–** दिनांक 29.03.2021 रोजीचे 21.00 वा. ते 21.30 वा. सुमारास, **उमरी ते मुदखेड येणारे रोडवर सोनटक्के यांचे शेताजवळ ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व **मयत साहेबराव गणपती गंड्रस वय 35 वर्षे रा. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड** असे मो.सा. क्र. एमएच/26–ए–9873 ने प्रवास करीत नमुद ठिकाणी मोटार सायकल थांबवून फिर्यादी हा लघुशंका करणेसाठी गेला व मयत मोटार सायकल जवळ थांबलेला असता यातील स्विप्ट कार क्र. एमएच/26–बीक्यु–1666 च्या चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास जोराची धडक देवून मयताचे मरणास कारणीभूत झाला. वगैरे **फिर्यादी हनुमंत भुजंगा पुयड वय 41 वर्षे व्यवसाय शेती रा. पुणेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं. 134/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री वटाणे, मो.क्र. 9823562807** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड